महाराष्ट्र शासन

<u>अत्यंत तातडीचे</u>

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉप्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १४ मार्च २०२०

प्रति,

जिल्हाधिकारी, (सर्व)
महानगरपालिका आयुक्त (सर्व)
पोलीस आयुक्त / अधिक्षक (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)

**विषय: राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.. (शॉपिंग मॉल बंद करणेबाबत)**

राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहे.

करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून **नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी राज्यातील सर्व शॉपिंग मॉलमधील सर्व दुकाने व आस्थापना (अत्यावश्यक किराणा सामान (Grocery), दुध व भाजीपाला व अन्य जीवनावश्यक वस्तू व औषधालय (Chemist shop) वगळून) दि.३१ मार्च,२०२० पर्यंत बंद ठेवण्यात याव्यात.** सदर आदेश साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने देण्यात येत आहेत.

तरी उपरोक्तनुसार सर्व जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त / अधिक्षक व महापालीका आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे संबंधित क्षेत्रात आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याबाबतच्या सूचना निर्गमित कराव्यात.

प्रदीप व्यास

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत** अपर मुख्य सचिव (गृह विभाग), मंत्रालय मुंबई
प्रत अपर मुख्य सचिव (महसुल) मंत्रालय मुंबई
प्रत अपर मुख्य सचिव (ग्रामविकास) मंत्रालय मुंबई
प्रत प्रधान सचिव (नगरविकास विभाग) मंत्रालय मुंबई
प्रत सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये) मंत्रालय मुंबई
प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)

प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत आयुक्त, अन्न व औषध प्रशासन
प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)
प्रत संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे
प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्रत मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
प्रत मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रत मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव